

झेपावलेले सोलापूर
सोलापूर तरुण भारत
४२ वा वर्धापन दिन
शनिवार, १ ऑगस्ट २०२६
१
माढा
बार्शी
माळशिरस
मोहोळ
उत्तर सोलापूर
पंढरपूर
दक्षिण सोलापूर
सांगोला
मंगळवेढा
अक्कलकोट




विहान क्रिकेट अकॅडमी
इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, सोलापूर
VCA
प्रशिक्षक
४२व्या वर्धापन
दिनानिमित्त
तरुण भारत
हार्दिक शुभेच्छा!
योगेश कोंपल
- प्रशिक्षणाची वेळ -
सकाळी ७ ते ९ सायंकाळी ४ ते ६
संपर्क : ९५११८३३९८७




दैनिक सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास
हार्दिक
शुभेच्छा!
तरुण भारत
- शुभेच्छुक -
डॉ. उज्वल मलजी
सौ. आरती मलजी
क्रीडा शिक्षक




मा.आ.श्री संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवस व
दै.तरुण भारत वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
मा.आ.बबनराव शिंदे
मा.रणजितसिंह शिंदे
मा.पंडीतकाका देशमुख
सभापती पंचायत समिती कुर्डूवाडी
मा.संजयमामा शिंदे
शुभेच्छुक : पंचायत समिती कुर्डूवाडी, ता.माढा




मा.यशवंत भैय्या संजयमामा शिंदे
करमाळा माढा मतदारसंघाचे माजी आमदार
मा.संजयमामा शिंदे
यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच
दै.तरुण भारतच्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
उद्योजक
* शुभेच्छुक *
मा.दयानंद सुरवसे
आदिशक्ती शिक्षणसंस्था वेताळवाडी, ता.माढा
आदिशक्ती अर्थमूव्हर्स




आमदार
मालक
मा. बबनराव शिंदे
मा.रमेश मालक शिंदे
करमाळा,माढा विधानसभेचे माजी आमदार
मा.संजयमामा शिंदे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
* शुभेच्छुक *
दादाश्री
हॉटेल ॲन्ड लॉजिंग चिंचगाव
आदर्श सरपंच
मा.यशवंत भैय्या शिंदे

# तेलुगु भाषिकांच्या सांस्कृतिक एकात्मतेचा सुवर्णवारसा

## महाराष्ट्राच्या साहित्य, कला, नाट्य अन् संगीत क्षेत्रात बहुमोल योगदान



तेलुगु भाषिकांचे स्थलांतर हे केवळ रोजगारासाठी झालेले नव्हते; ते एका संस्कृतीचे दुसऱ्या संस्कृतीशी संवाद साधणारे पाऊल होते. काळाच्या ओघात या समाजाने महाराष्ट्राच्या मातीशी आपले नाते इतके घट्ट जोडले, की भाषा वेगळी असूनही भावविश्व, संस्कार व सामाजिक बांधिलकी मात्र एकरूप झाली. म्हणूनच सोलापुरातील तेलुगु भाषिक समाज हा ‘परप्रांतीय’ न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात सोलापूर हे केवळ वस्त्रोद्योगासाठीच नव्हे, तर विविध भाषिक, धार्मिक व सांस्कृतिक समूहांच्या एकात्म सहजीवनासाठीही ओळखले जाते. या प्रवाहात दीडशे वर्षांपूर्वी आंध्र प्रदेश व तेलंगणातून सोलापुरात स्थायिक झालेल्या तेलुगु भाषिक समाजाचे योगदान अत्यंत मोलाचे व प्रेरणादायी आहे. हातमाग, यंत्रमाग व पॉवरलूम या वस्त्रोद्योगाच्या माध्यमातून त्यांनी सोलापूरला जागतिक नकाशावर स्थान मिळवून दिले; पण त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्राच्या साहित्य, कला, नाट्य व संगीत आदी क्षेत्रांनाही आपल्या प्रतिभेने समृद्ध केले.





संकलन : प्रभाकर भिमनाथ
शब्दांकन : नरेंद्र सुभाष गुंडेली
अध्यक्ष, तेलुगु मराठी साहित्यिक संस्था, सोलापूर
भ्र. ९८२३६४८७६५

### साहित्य : शब्दांतून घडलेली सांस्कृतिक

मराठी साहित्यविश्वात तेलुगु भाषिक साहित्यिकांनी जे योगदान दिले, ते केवळ संख्येने नव्हे तर दर्जानेही उल्लेखनीय आहे. तेलुगुचा गळा, मराठी लळा हे वाक्य त्यांच्या लेखनाची नेमकी ओळख सांगते. मातृभाषा तेलुगु असली, तरी अभिव्यक्तीची भाषा मराठी स्वीकारून त्यांनी मराठी साहित्यात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले.

पद्मश्री मारुती चितमपल्ली हे या योगदानाचे सर्वोच्च प्रतीक मानले जातात. ‘निसर्ग लेखक’ म्हणून त्यांनी मराठी साहित्यात नवे दालन उघडले. पशू, पक्षी, मत्स्य आणि निसर्ग यांवरील त्यांच्या २१ ग्रंथांनी वाचकांमध्ये निसर्गाबद्दल संवेदनशीलता निर्माण केली. पशुकोश, पक्षीकोश, मत्स्यकोश आणि निसर्गकोश ही त्यांच्या लेखणीची मैलाची दगडे ठरली. सोलापुरात भरलेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले, ही बाब सोलापूरच्या सांस्कृतिक इतिहासातील सुवर्णक्षण ठरली. महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार आणि भारत सरकारचा पद्मश्री भूषण सन्मान हे त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवरील दखल आहे.



डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी साहित्याला सामाजिक वास्तवाची जोड दिली. एका साळियाने हे त्यांचे आत्मचरित्र वस्त्रोद्योगातील कष्टकरी समाजाचे जगणे उलगडून दाखवते. काव्यसंग्रह, कादंबऱ्या आणि तेलुगु साहित्याचे मराठी अनुवाद यांच्या माध्यमातून त्यांनी मराठी–तेलुगु साहित्यिक संवाद अधिक दृढ केला. आंध्र प्रदेश शासनाने दिलेली डी. लिट. पदवी हा त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव आहे.

अ‍ॅड. व्यंकटेश देवनपल्ली यांनी ऐतिहासिक व सामाजिक विषयांवर कादंबऱ्या लिहून मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटविला. राजाधिराज श्रीकृष्णदेवराय यांसारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी इतिहास आणि कल्पनाशक्ती यांचा सुरेख संगम साधला. इंद्रधनू, स्वानंदी हे मराठी कादंबरी प्रकाशित झाले. तेलुगु अनुवादित पुस्तके मराठीत लिहून मराठी साहित्यात बहुमोल योगदान दिले. त्यांना साहित्य गरिमा समिती, हैदराबाद यांच्याकडून हिंदी अनुवाद पुरस्कार मिळाला. तसेच इतर अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले.

प्रा. वसंत सोमा यांचा एक कविता संग्रह वसंतोत्सव व एक लघु कादंबरी, लघुकथा, मार्कंडेय पुराण व वंशावळी ही पुस्तके प्रकाशित झाली. सूर्यकांत कामून यांची कविता मनातल्या, रूपेरी गर्विता, मैथिली ही पुस्तके प्रकाशित झाली. कालिदास चवडेकर यांचे आत्मभान, गझल तुझी माझी, दूर मौनाच्या किनारी, हवेवर स्वार झालो मी हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यांना मनोरमा साहित्य पुरस्कार, रोटरी क्लब पुरस्कार, लायन्स क्लब पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. विलास बेत यांनी कामगारांची चळवळ व वस्त्रोद्योग यावर दोन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. रेणुका बुधारम यांचे तेंदूची पाने काव्यसंग्रह, आनंद कादंबरी, विडी कामगार मातांच्या मुलांची यशोगाथा हे संकलित पुस्तक, जय श्रीराम संकलित काव्यसंग्रह, श्री मार्कंडेय चरित्र आदी साहित्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांना नारीरत्न पुरस्कार, कर्तृत्ववान सुकन्या पुरस्कार, साहित्यभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नागेंद्र माणेकरी यांची संगीत चाफा, कथा अस्तित्वाची ही दोन नाट्य पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना लायन्स क्लब, सोलापूर जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्रा. नरेंद्र गुंडेली यांचे राजीव व या जन्मावर हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांना स्वरांजली चॅनेलकडून २०२३ चा उदयोन्मुख साहित्यिक पुरस्कार व महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ओगन्ना देवनपल्ली यांचे सु सौरभालू, योगन्ना सातकम, श्री सिद्धरामेश्वर सातकम, इष्टपदूला प्रज्ञान प्रसूनालू ही तेलुगु पुस्तके, काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रकाशित आहेत. राधा यरझल यांचा तेलुगु काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. तसेच भिक्षापती येमूल यांचा एक काव्यसंग्रह प्रकाशित आहे. अशा प्रकारे नव्या पिढीतील लेखक–कवी ही परंपरा आत्मविश्वासाने पुढे नेत असल्याने हा साहित्यिक वारसा अखंड राहील, याची खात्री वाटते.

### वाचनालये : ज्ञान आणि संस्कृतीची केंद्रे

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम ही सोलापुरातील सांस्कृतिक चळवळीची आधारस्तंभ आहेत. तेलुगु भाषिकांमध्ये साहित्य, कला, नाट्य व संगीत रुजविण्यासाठी या वाचनालयांचे विशेष योगदान आहे. पूर्व विभाग वाचनालयाचे सध्या सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, या वाचनालयात ३५ हजार मराठी, तेलुगु, हिंदी, कन्नड, इंग्रजी पुस्तके उपलब्ध आहेत.

एमपीएससी, यूपीएससी, पोलिस भरती, राज्य निवड स्पर्धा परीक्षा यासाठी विशेष अभ्यासिकेची मोफत सोय केलेली आहे. या वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी व कार्यवाह अरविंद चिन्नी कार्यरत आहेत. पांडुरंग दिड्डी यांनी ‘अबब’ हा दिवाळी अंक दहा वर्षे प्रकाशित करून संपादकाचा मान मिळविला.सध्या पूर्व विभाग वाचनालयाचा सुवर्ण महोत्सवी वर्ष असून या निमित्ताने त्यांनी कविसंमेलन, चित्रकला स्पर्धा व बुध्दीबळ स्पर्धा घेऊन पारितोषिक वितरण केलेले आहे. तसेच वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेणार आहेत. तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयमला यंदा २७ वर्षे झाली असून, अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, कार्यवाह तिपण्णा गणेरी कार्यरत आहेत. या ग्रंथालयाने १२ व १३ फेब्रुवारी १९९६ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे तेलुगु– मराठी साहित्य चर्चासत्र आयोजित करण्यात केले होते. या चर्चासत्राला माजी खासदार धर्मण्णा सादूल, शिवाजी सावंत, माणिकराव दनफळवार, सदानंद येलारे, प्रभागोणकर, निशिकांत ठकार, सी. नारायण रेड्डी, कालोजी नारायणराव, डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, मल्लिकार्जुन कमटम, तिपण्णा गणेरी, बालराज बोल्ली उपस्थित होते. तसेच २३ व २४ मार्च २०१० रोजी बोल्ली मंडळी व तेलुगु विद्यापीठ, हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात तेलुगु सिने अभिनेते बाबूमोहन, उद्योजक राम रेड्डी, व्यावसायिक मल्लिकार्जुन कमटम यांचा सत्कार करण्यात आला. २०११ मध्ये इरण्णप्पा बोल्ली व रायमल्लू कमटम यांच्या नियोजनातून तेलुगु भाषिक कर्तृत्ववान लोकांना समाजभूषण व यशवंत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अशा प्रकारे या दोन्ही वाचनालयांनी समाजात वाचनसंस्कृती रुजवून वैचारिक समृद्धी साधली.



### चित्रकला : रंगरेषांतून व्यक्त झालेली संस्कृती



सोलापुरातील तेलुगु भाषिक चित्रकारांनी दृश्य कलेतही आपले वेगळे स्थान निर्माण केले. यल्ला आणि दासी या चित्रकारांनी चित्रपट पोस्टर कलेत देशभर नाव कमावले. त्यांच्या चित्रांत केवळ रंगरेषा नव्हत्या, तर त्या काळातील सामाजिक व सांस्कृतिक जाणिवा प्रतिबिंबित होत होत्या. त्यानंतर सुदर्शन देवरकोंडा हे एक उत्कृष्ट चित्रकार, प्राचार्य व शिक्षक म्हणून नावारूपास आले. ते आजही उतार वयात चित्रे काढण्याचे काम करत आहेत.

मल्लिकार्जुन कमटम यांना चित्रकलेची आवड असून, फावल्या वेळेत त्यांनी विविध प्रकारची चित्रे साकारली आहेत. संजय नोरा यांची चित्रे बऱ्याच प्रदर्शनात विक्रीस गेली आहेत. ते व्यावसायिक चित्रकार म्हणून कार्यरत आहेत. गणेश तडका हे कुचन प्रशालेमध्ये सहशिक्षक असून, त्यांनी बऱ्याच विद्यार्थ्यांना चित्रकलेचे धडे दिलेले आहेत. श्रावणी अन्नलदास या उत्कृष्ट चित्रकार असून, महाराष्ट्रात व इतर राज्यांत त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन झालेले आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांकडून त्यांच्या कलेचे विशेष कौतुक करण्यात आले.

पुष्कराज गोरंटला यांनी चित्रकलेची आवड जोपासून लिओ आर्ट कॅडमीची स्थापना केली. प्राचीन वस्तू जपण्याचे विशेष कार्य त्यांनी केले आहे. विविध ठिकाणी त्यांनी चित्रांचे प्रदर्शन भरविलेले आहे. नूतन चित्रकार श्रुतिका जडल हिचे शिक्षण चालू असून, तिने काढलेली चित्रे प्रदर्शनात विक्रीस गेलेली आहेत. अशा प्रकारे पूर्वभागातील कलाकारांनी चित्रकलेच्या क्षेत्रात विविध शैली आत्मसात करून सोलापूरच्या कलाविश्वाला समृद्ध केले.

### नाट्य : रंगमंचावरील जिवंत परंपरा



सोलापुरातील नाट्यचळवळीत तेलुगु भाषिकांचे योगदान महत्त्वाचे आहे. सोलापूरच्या नाट्य क्षेत्रात नागेश कन्ना, तिप्पणा नादरगी, विश्वंभर कन्ना, सिडगिद्दी, सिद्धेश्वर नादरगी, शंकर नादरगी, मल्लिकार्जुन कमटम, दासरी, इंदापुरे आदींनी सुरवातीला नाट्य मंडळ स्थापन करून तेलुगु भागवतमम हे नाटक बऱ्याच ठिकाणी सादर केले. त्यानंतर मराठी नाटकांचे अनुवाद करून नाटके सादर केली. यात ‘एकच प्याला’ या मराठी नाटकाचे ‘सुरा वंश हरा’ हे तेलुगु रूपांतर रसिकांच्या विशेष पसंतीस उतरले.

डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, बालाजी भिमनपल्ली, नागेंद्र माणेकरी, प्रा. अजय दासरी, शोभा बोल्ली, दत्तात्रय श्रीराम, नारायण जानकी, बाळकृष्ण पोगूल यांनी पेन्ळीचुपुलू व हद्दपार हे नाट्य सादर करून रसिकांची मने जिंकली.

प्रा. अजय दासरी यांनी योगी वेमन्ना, ऐक रे वेमा, थँक यू मि. ग्लाड ही नाटके सादर करून रसिकांची मने जिंकली. सध्या ते अखिल भारतीय नाट्य परिषद, सोलापूर शहराचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.तसेच अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई याचे ते सोलापूर जिल्हयाचे नियामक काम पाहत आहेत.

दत्तात्रय श्रीराम यांना रंगकर्मी ढसाळ स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी ‘जय जय स्वामी समर्थ’ या चित्रपटात स्वामी समर्थांची व्यक्तिरेखा उत्कृष्ट पद्धतीने साकारली. नवोदितांमध्ये ममता बोल्ली, अंबादास कनकट्टी, प्रथमेश माणेकरी, हर्षवर्धन माणेकरी आदी नवोदित कलाकार ही नाट्यपरंपरा नव्या ऊर्जा व प्रयोगशीलतेने पुढे नेत आहेत.



### संगीत : स्वरांतून जपलेली ओळख



सोलापुरातील शास्त्रीय व भक्तिसंगीताच्या परंपरेत तेलुगु भाषिक कलाकारांनी आपला ठसा उमटविला आहे. विठ्ठलराव चन्ना, गोविंदराव बुगडे, रामचंद्र कोटा, संजीव नादरगी, मेरगू, किशोर अंकम, पुंडलिक दोमल, कृष्णाहरी रच्चा यांसारख्या ज्येष्ठ कलाकारांनी शास्त्रीय संगीताची पायाभरणी केली. शास्त्रीय संगीतात त्यांनी बहुमोल ठसा उमटविला. त्यानंतर गोवर्धन कमटम, विलास मादास, अंबादास यंगल, अजय यंगल, संगीता इंदापुरे, इंदिरा गड्डम, अनुराधा गंगूल, बालाजी कारमपुरी, बालाजी द्यावरकोंडा, वरकल शिवप्रसाद, वरकल अक्षय, ऋषीकेश कमटम यांनी शास्त्रीय संगीत, भक्तिगीते, भजने सादर करून संगीत क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे. गोवर्धन कमटम यांना ‘वेमन्ना’ नाटकाच्या पार्श्वगायन एकांकिका संगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. संगीत ही केवळ कला न राहता समाजाला जोडणारे माध्यम बनले.

### एकात्मतेचा दीपस्तंभ

सोलापुरातील तेलुगु भाषिक समाजाने भाषा व प्रांताच्या सीमा ओलांडून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात आपले अढळ स्थान निर्माण केले आहे.

उद्योग, साहित्य, कला, नाट्य आणि संगीत या सर्व क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान हे केवळ भूतकाळातील गौरव नसून, भविष्याला दिशा देणारे आहे.






# इतिहासाचा वारसा, कष्टाची परंपरा आणि भविष्याचा वेध

# परंपरेच्या पायावर उभारला विकासाचा नवा अध्याय





**महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील सोलापूर हा जिल्हा संतपरंपरा, कष्टकरी संस्कृती, उद्योगशीलता आणि कृषी अर्थव्यवस्थेचा संगम म्हणून ओळखला जातो. संत श्री सिद्धरामेश्वर, संत चोखामेळा, संत दामाजी, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ आणि पंढरपूरच्या विठ्ठल भक्तीने समृद्ध झालेली ही भूमी आज विकासाच्या नव्या उंबरठ्यावर उभी आहे. गेल्या दोन दशकांत सोलापूर शहर आणि जिल्ह्याने अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. अनेक दशकांपासून दुष्काळ, पाणीटंचाई, स्थलांतर आणि औद्योगिक मर्यादा या प्रश्नांशी झुंज देणाऱ्या सोलापूरने आज विकासाच्या नव्या दिशा शोधण्यास सुरुवात केली आहे.**

गेल्या वीस वर्षांत शहराचा चेहरामोहरा मोठ्या प्रमाणात बदलला. रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपूल, राष्ट्रीय महामार्गांची उभारणी, शहरातील अंतर्गत वाहतुकीतील सुधारणा, एलईडी प्रकाशयोजना, उद्याने, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण आणि डिजिटल नागरी सेवा यांमुळे शहर अधिक आधुनिक होत आहे. स्मार्ट सिटी अभियानातून पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, नागरिकाभिमुख सेवा अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न झाला आहे. सोलापूरचे भौगोलिक स्थान लक्षात घेता महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र म्हणून त्याचे महत्त्व वाढत आहे.

एकेकाळी चादर, टॉवेल, हातमाग, यंत्रमाग आणि बीडी उद्योगासाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूरने आता उद्योगांचे स्वरूप बदलण्यास सुरुवात केली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, अभियांत्रिकी, अन्न प्रक्रिया, कृषी प्रक्रिया, औषधनिर्मिती आणि सेवा क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळत आहे. उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या शासकीय योजनांमुळे तरुणांमध्ये नवउद्योग उभारण्याची मानसिकता वाढू लागली आहे. औद्योगिक विकासाचा वेग अपेक्षेइतका नसला तरी बदलाची दिशा सकारात्मक आहे.

सोलापूरची खरी ताकद आजही शेती आहे. ज्वारीची राजधानी म्हणून ओळख असलेल्या या जिल्ह्याने डाळिंब, द्राक्षे, ऊस, तूर, हरभरा आणि विविध कडधान्यांच्या उत्पादनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आधुनिक सिंचन, ठिबक पद्धती, यांत्रिकीकरण आणि पीक विविधीकरणामुळे शेतीत बदल घडत आहेत. कृषी प्रक्रिया उद्योग वाढल्यास शेतमालाला अधिक मूल्य मिळू शकते. मात्र, हवामान बदल, अनियमित पर्जन्यमान, भूजल पातळीतील घट आणि पाण्याचे नियोजन ही पुढील काळातील सर्वात मोठी आव्हाने राहणार आहेत.

शिक्षण क्षेत्रातही सोलापूरने मोठी झेप घेतली आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत दर्जेदार संस्था निर्माण झाल्या. अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, फार्मसी, व्यवस्थापन आणि तांत्रिक शिक्षणामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध झाले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्याधारित शिक्षणाला नवी दिशा दिली आहे. डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही संधींचे क्षितिज विस्तारत आहे.



राजाराम मा. म्हस्के
भ्र. ८८८८८४७३९

आरोग्य सेवांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, खासगी रुग्णालये आणि सुपर स्पेशालिटी उपचार सुविधांमुळे सोलापूर आज मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र बनत आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात आरोग्य व्यवस्थेने दाखविलेली क्षमता ही जिल्ह्याच्या सामर्थ्याची साक्ष आहे.

धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटन हा सोलापूरच्या विकासाचा आणखी एक महत्त्वाचा आधार ठरू शकतो. पंढरपूर, अक्कलकोट, श्री सिद्धेश्वर मंदिर, मंगळवेढा आणि जिल्ह्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे वर्षभर लाखो भाविकांना आकर्षित करतात. आधुनिक पर्यटन सुविधा, स्वच्छता, माहिती केंद्रे आणि स्थानिक हस्तकलेला प्रोत्साहन दिल्यास पर्यटनातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. सामाजिक क्षेत्रात महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, युवक संघटना आणि विविध सामाजिक चळवळींनी ग्रामीण विकासाला नवी ऊर्जा दिली आहे. डिजिटल व्यवहार, ई-सेवा, स्वच्छता अभियान, जलसंधारण, वृक्षारोपण आणि कौशल्य विकास यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन दिसून येत आहे. नागरिकांचा प्रशासनातील सहभाग वाढणे ही लोकशाहीच्या दृष्टीने आशादायी बाब आहे. तथापि, विकासाचा हा प्रवास अजून अपूर्ण आहे. पाणीटंचाई, बेरोजगारी, औद्योगिक गुंतवणुकीचा मर्यादित वेग, पर्यावरणीय समतोल, ग्रामीण-शहरी विकासातील तफावत, वाढते शहरीकरण आणि कुशल मनुष्यबळाचे स्थलांतर ही गंभीर आव्हाने आजही कायम आहेत. विशेषतः जलव्यवस्थापन आणि रोजगारनिर्मिती या दोन विषयांवर दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता आहे. विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा नसून, मानवी जीवनमान उंचावण्याचा असतो, हे विसरून चालणार नाही.

येणाऱ्या काळात सोलापूरसमोर अनेक संधी आहेत. तीन राज्यांच्या सीमेवरील भौगोलिक स्थान, कृषी व औद्योगिक क्षमता, धार्मिक पर्यटन, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील वाढ, तसेच राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे संपर्क या सर्वांचा योग्य उपयोग झाला तर सोलापूर पश्चिम-दक्षिण भारतातील महत्त्वाचे आर्थिक केंद्र बनू शकते. यासाठी शासनाची दूरदृष्टी, उद्योगक्षेत्राची गुंतवणूक, शेतकऱ्यांचे नवोपक्रम, युवकांची उद्योजकता आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

आजचा सोलापूर हा संघर्षातून घडलेला, परिश्रमातून उभा राहिलेला आणि नव्या युगाची चाहूल ओळखणारा जिल्हा आहे. विकासाची वाट ही स्पर्धेची नसून सहकार्याची आहे. शहर आणि ग्रामीण भाग, उद्योग आणि शेती, परंपरा आणि आधुनिकता, विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखत पुढे जाणे हीच खरी झेप ठरेल.

झेपावलेलं सोलापूर ही केवळ घोषवाक्यात्मक संकल्पना नाही; ती प्रत्येक सोलापूरकराच्या कष्टाची, जिद्दीची आणि उज्ज्वल भविष्याच्या सामूहिक स्वप्नाची अभिव्यक्ती आहे. ही झेप सातत्याने, समतोलाने आणि सर्वसमावेशक विकासाच्या बळावर कायम राहिली, तर सोलापूर महाराष्ट्राच्या प्रगतीच्या नकाशावर अधिक ठळकपणे उजळून निघेल.

१९८५ साली प्रखर राष्ट्रीय विचाराची पेरणी करण्यासाठी दैनिक सोलापूर तरुण भारत सोलापूरात सुरू झाला आज बेचाळीस व्या वर्षांत पदार्पण करत आहे. यनिमित्त सर्व वाचकवर्ग, जाहिरातदार व सकल सहकारी यांना यनिमित्ताने मनापासून शुभेच्छा देतो.

---

# सोलापूर शहराची बलस्थाने!

**सोलापूर हे महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध, ऐतिहासिक शहर आहे. येथील मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे या चार देशभक्तांनी स्वातंत्र्य संग्रामात हौतात्म्य पत्करले. मार्शल लॉ मुळे सबंध देशभर सोलापूरचा नावलौकिक झाला होता. आज हे शहर नवनवीन विकासात्मक वाटा धुंडाळताना, आपली विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करताना दिसत आहे. येथील वातावरण इतर शहरांच्या तुलनेत चांगले आहे. वाहतुक कोंडीचे प्रश्न, गर्दीची समस्या येथे नाही. मला जाणवलेली, मी अनुभवलेली सोलापूर शहराची खालील काही बलस्थाने.**










### रस्ते महामार्ग -

सोलापूर हे महाराष्ट्रातील असे एकमेव शहर आहे, की जे भारतातील मुंबई, हैद्राबाद व बंगलोर या महानगरांशी रस्ते महामार्गांनी जोडले गेले आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. बंगलोर व हैद्राबाद ही भारतातील आय. टी. हब म्हणून उदयाला आलेली शहरे आहेत. तसेच, येथील बाजारपेठेत सोलापूर जिल्ह्य़ातील शेतीमालाला चांगलाच उठाव आहे. भाज्या, फळे यांची बाजारपेठ रस्ते महामार्गामुळे सोलापूरला मिळालेली फार मोठी संधी आहे. तसेच, बंगलोर व हैद्राबाद या रस्ते महामार्गावर विजापूर, हंपी, हॉस्पेट, कुडलसंगम,श्रवणबेळगोळ सारखी जागतिक वारसा असलेली अध्यात्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळे जोडलेली आहेत. अशा विविध कारणांमुळे सोलापूर येथील रस्ते महामार्गांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### रेल्वे जंक्शन-

सोलापूर हे दक्षिण भारताला रेल्वेने जोडणारे प्रमुख स्टेशन आहे. दक्षिण भारत व उत्तर भारतात होणारी माल व प्रवासी वाहतूक या दोन्ही क्षेत्रात सोलापूर हेच प्रमुख ठिकाण असल्याने सोलापूरला विशेष महत्त्व आहे. सोलापूर येथून वंदे भारत ही अत्याधुनिक व अतिजलद रेल्वे सुरू केल्याने सोलापूर येथून मुंबई ही देशाची राजधानी अवघ्या सहा तासात गाठणे शक्य होते. अशा विविध कारणांमुळे सोलापूर येथील रेल्वे स्थानकाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



मयुरेश कुलकर्णी
भ्र. ९४२१०२४८८१

### विमानसेवा-

सोलापूर येथून मुंबई, गोवा अशा विविध ठिकाणी सुरू झालेली व होत असलेली विमान सेवा म्हणजे सोलापूर शहराला जागतिक स्तरावर नेऊन ठेवण्यास उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. येथील वस्त्रोद्योग, आय. टी. पार्क, तसेच पर्यटन व्यवसाय वृद्धिंगत होण्यास यामुळे मदत होत आहे. अशा विविध कारणांमुळे सोलापूर येथील विमानसेवेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

### पर्यटन केंद्र सोलापूर-

सोलापूर शहरात ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर, भूलौकिचे वैकुंठ पंढरपूर, तुळजापूर येथील तुळजाभवानी मातेचे मंदिर, अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिर अशा महत्त्वाच्या अध्यात्मिक मंदिरांमुळे आपोआपच सोलापूर शहराचे महत्त्व वाढले आहे. येथून पुढील ठिकाणांना भेटी देताना भाविक आवर्जुन सोलापूर येथे येतात त्यामुळे सोलापूर शहराला एक पर्यटक केंद्र म्हणून आपोआपच महत्त्व प्राप्त झाले आहे.

### शिक्षणक्षेत्र व आरोग्यक्षेत्र-

सोलापूर येथील महत्त्वाच्या शिक्षणसंस्था तेथे मिळणाऱ्या दर्जेदार सेवासुविधा, स्वस्त व अत्याधुनिक उपचार यामुळे सोलापूर येथे शेजारील कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेकजण शिक्षण घेण्यासाठी व उपचार घेण्यासाठी सोलापूर येथे येतात. आरोग्य व शिक्षण क्षेत्रात सोलापूरला मिळत असलेले हे वाढते महत्त्व सोलापूरचे नक्कीच महत्त्व वाढवत आहे.

### सांस्कृतिक व बहुभाषिक शहर-

सोलापूर येथे विविध जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषेचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. त्यांचे विविध आचारविचार, प्रथा, पद्धती, सण, समारंभ यामुळे सोलापूर शहराच्या सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाची विविधांगी प्रगती होत आहे.महाराष्ट्रातील एक बहुभाषिक शहर म्हणून सोलापूर शहराचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित होत आहे.

### साहित्य नगरी सोलापूर-

सोलापूर येथे मराठी, तेलगू,कन्नड, हिंदी, उर्दू, या भाषेतील दर्जेदार साहित्य निर्माण झाले आहे. विविध भाषेतील अनेक साहित्यिक मंडळींनी अनेक सन्मानाची साहित्य निर्मिती करत शहरात साहित्यिक वातावरण जपले आहे.

शहरात कायमच साहित्य विषयक चर्चा, पुस्तक प्रकाशन सोहळे, कविसंमेलने होत असतात, त्यामुळे सोलापूर येथील साहित्यिक वाटचाल जोमाने सुरू असून अनेक उदयोन्मुख साहित्यिक निर्माण होत आहेत.

उद्याच्या साहित्यिक विश्वात सोलापूर आपले नाव कोरताना दिसत आहे. या कारणांमुळे सोलापूर शहर हे साहित्यिक नगरी म्हणून सुप्रसिद्ध होत आहे.

अशी आहे ही आमची
सोलापूर नगरी
अवश्य यावे एकदा तरी
या आमच्या सोलापूर नगरी

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २२ वा व दैनिक तरुण भारतच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!





-: शुभेच्छुक :-

**मा. प्रा. सचिन मारुती गायकवाड**

सिनेट व व्यवस्थापन परिषद,

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**विद्यापीठाच्या वतीने केलेली उल्लेखनीय कामे**

- विद्यापीठाच्या भव्य प्रशासकीय इमारतीसाठी सातत्याने पाठपुरावा
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टीपर्पज सभागृह होण्यासाठी प्रयत्न
- विद्यापीठ खेळाडूंना विमान प्रवास सुविधा उपलब्ध करून दिली.
- स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने विशेष अध्यासन सुरू करण्यासाठी प्रयत्न
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे सिंथेटिक ॲथलेटिक्स ग्राउंड आणि स्विमिंग व डायव्हिंग पूल उभारण्यासाठी खेलो इंडियाकडे ६३ कोटीचा प्रस्ताव
- आंतरराष्ट्रीय खेळाडू अरुण राठोड, भुवनेश्वरी जाधव आणि तनिष्का ठोकळ यांना प्रत्येकी दोन लाखांपर्यंतची भरीव आर्थिक मदत.





स्व.मा.अजितदादा पवार



मा.आ.बबनराव शिंदे



मा.रणजितसिंह शिंदे

करमाळा माढा मतदारसंघाचे माजी आमदार

## मा.संजयमामा शिंदे

यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच

दै.तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा..!



**डॉ.अशिष रजपूत** गटनेते : माढा तालुका पंचायत समिती कुर्डूवाडी

* शुभेच्छुक :- **ध्रुव मशिनरीज, रिधोरे**

सोलापूर

# तरुण भारत

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा.

शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचलित,

SHIKSHAN & KRUSHI VIKAS PRATISHTHAN MEDSHINGI'S

SCPM

## सह्याद्री कॉलेज ऑफ फॉर्मसी, मेथवडे,

मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर ४९३३०७



कै. डॉ. दिलीपकुमार मछिंद्र इंगवले (संस्थापक अध्यक्ष)

### -: महाविद्यालयास यांची मान्यता :-

भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद, नवी दिल्ली ( पी.सी.आय), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (डि.टी.ई) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिषद मुंबई (एम. एस. बी.टी.ई) संलग्नित.

### -: अभ्यासक्रम :-

१. डी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदविका)

२. बी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदवी)

३. एम. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदयुत्तर)(फार्मासुटीकल केमिस्ट्री)

### -: महाविद्यालयाचे वैशिष्टये :-

- अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद उत्कृष्ठ निकालाची परंपरा सुसज्ज व सर्व सोयीयुक्त प्रयोगशाळा.
- प्रशस्त इमारत व सर्व सोयीयुक्त क्लासरुम महाराष्ट्र शासनाच्या व भारत सरकारच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वसतिगृह विविध संशोधनास स्वतंत्र ॲनिमल हाऊस.
- सर्व सेवा सुविधा युक्त खानावळ व उपहारगृह परिवहन सुविधा व पार्किंग व्यवस्था महाविद्यालय परिसर सीसीटीव्ही (CCTV) च्या निगराणी खाली सर्व पुस्तके व सोयीयुक्त डिजिटल लायब्ररी २४ तास विद्युत सुविधा विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंटची सुविधा सुसज्ज व सर्व सोयीयुक्त मशीन रुम.
- सेंट्रल इन्स्ट्रयुमेंट लॅब संशोधन प्रयोगशाळा अंतर्गत व बहिर्गत खेळाची सुविधा व खेळाची मैदान.



-: शुभेच्छुक :-

शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचलित,

**सह्याद्री कॉलेज ऑफ फॉर्मसी, मेथवडे,**

मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर ४९३३०७

स्थापना : २००४ | शासनमान्य | माध्यम : सेमी इंग्रजी

*We Shape The Bright Future*

ज्ञान, विज्ञान, सुसंस्कारासाठी शिक्षण प्रसार

जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, कुर्डूवाडी संचलित

जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी

# जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर, कुर्डूवाडी

टेंभूर्णी रोड, टेंभूर्णी नाका, कुर्डूवाडी संपर्क ९८५०६१०८६६ / ९८९०७९४८१५

**Email :** jsvk44@yahoo.com **Website :** www.jivhalaschoolkurdwadi **Youtube :** jivhalasusanskar vidyamandir.kurduwadi



*** महाराष्ट्रातील पहिल्या ४० शाळांच्या यादीत स्थान मिळवणारी एकमेव शाळा**

*** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र.३ माढा तालुक्यात प्रथम क्रमांक**

*** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

- प्रवेश वर्ग : पूर्व प्राथमिक, खेळगट, बालवाडी, छोटा गट, मोठा गट
- प्राथमिक : इ.१ली ते ५ वी
- उच्च प्राथमिक : इ.६ वी ते ८ वी
- माध्यमिक : इ.८ वी ते १० वी

* विद्यालयाची वैशिष्ट्ये *

- सुसज्ज भव्य इमारत
- कायमस्वरुपी नियुक्त गुणवत्ताधारक शिक्षक
- मर्यादित प्रवेश
- अमेरिकेतील मुलांशी संवाद साधणारी शाळा
- सर्व स्पर्धा परीक्षांची तयारी करणारी शाळा



विशेष बाब :

* कॉग्नेटिव्ह एक्सचेंज उपक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांशी संवाद साधणारे विद्यालय

* १४ वर्षे व १७ वर्षे वयोगटात तालुकस्तरीय खो-खो स्पर्धेत माढा तालुक्यात सलग सहा वर्ष प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान.

* सलग दोन वर्ष मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तालुकास्तरावर बक्षीस पात्र शाळा

* बाह्य मूल्यांकनातून महाराष्ट्र राज्यातून पहिल्या ४० शाळांच्या यादीत स्थान मिळवणारी शाळा.




पाल्याच्या प्रती पालकांच्या अपेक्षा पूर्ण करणारी शाळा

सोलापूर 'तरुण भारत' वर्धापनदिन चिरायु होवो..!



मा.श्री.अजित वायचळ
सचिव



मा.श्री.शिवराज वायचळ
संस्थापक अध्यक्ष



मा.श्रीमती. सारिका गोटे
मुख्याध्यापिका

जिव्हाळात प्रवेश घ्या, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हमी मिळवा... जिव्हाळात प्रवेश घ्या आणि पाल्याच्या भविष्यासाठी निश्चित रहा...